जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२३/०९/२०२४
## दि.२२/०९/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ५२७/२०२४, भारतीय न्याय सहिंता कलम १०९(१),३५१, |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४० वर्ष,रा.सिंहगडरोड पुणे |
| **आरोपीत** | विधीसंघर्षीत बालक वय १६ वर्षे रा.सिंहगडरोड पुणे (ताब्यात) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०९/२०२४ रोजी रात्रौ २०/१० वा.चे दरम्यान गोल्डन चिकन सेंन्टर जवळील टुव्हीलर गॅरेज दुकान समोर,गणेश कॉलनी महादेव नगर सिंहगडरोड पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे वडील हे वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी उभे असता यातील नमुद बालक याने फिर्यादी यांचे वडीलांच्या शेजारी उभा राहुन गुळना करत असतांना त्याने तोंडातील पाणी फिर्यादी यांचे वडीलांच्या अंगावर उडवले, त्यावेळी फिर्यादी यांच्या वडीलांनी विधीसंघर्षीत बालकाच्या कानाखाली मारुन त्याला जाब विचारला असता त्याचा राग येवुन नमुद बालकाने धमकी देवुन जवळ असलेला दगड उचलुन जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने फिर्यादी यांचे वडीलांच्या डोक्याच्या वरील उजव्या बाजुला,डाव्या भुवई वरती व डोक्याच्या मागील बाजुस मारुन त्यांना गंभिर जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.निकेतन निंबाळकर,मो.नं.८००७०६९००० |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे १०८७/२०२४,भारतीय न्याय संहीता कलम १०९,३५२,११५(२),सह आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | एक इसम वय २८ वर्ष,रा.उंड्री पुणे |
| **आरोपीत** | अरबाज अरिफ सय्यद,वय २८ वर्ष,रा.कुबेरा कॉलनी,एनआयबीएम रोड,कोढवा खु.पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०९/२०२४ रोजी सकाळी १०/३० वा.चे सुमारास कड़नगर चौक येथील एस टायर या पंक्चरचे दुकानासमोर,कोंढवा पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे वर नमुद केले ता.वेळी एस टायर या पंक्चरचे दुकानात चारचाकी गाडीचे पंक्चर काढून घेत असताना नमुद इसम याने फिर्यादी यांनी दिनांक २१/०९/२०२४ रोजी त्याचा फोन उचलला नाही व त्यास पेट्रोल साठी पैसे दिले नाहीत या कारणा वरुन याचा राग मनात ठेवून फिर्यादी यांना शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी मारुन त्यांचे डोक्यात तसेच उजव्या हातावर धारदार शस्त्राने वार करून फिर्यादी यांना गंभीर जखमी करून जीवे ठार मारण्याचा प्रयल केला आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी.पुजा पाटील मो.नं.७७६७०५३९२७ |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे ३१४/२०२४, भारतीय न्याय संहीता कलम ३०९(४) |
| **फिर्यादी** | एक महिला वय २९ वर्षे, रा.टिंगरे नगर,पुणे |
| **आरोपीत** | मोपेड वरील एक अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २२/०९/२०२४ रोजी सकाळी ०७/३० वा.चे.सुमारास सनशाईन हॉटेलचे समोरील रोडवर,शारदा हॉटेल जवळ,टिंगरे नगर,लेन नं ०१ विमानतळ रोड,विश्रांतवाडी पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया मॉर्निग वॉक करत असताना,नमुद इसमांनी मोपेडवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील ४१,०००/-रु.किमतीचे सोन्याचे मंगळसुत्र जबरी चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.पदमराज गंपले मो.नं.८९८३७६५६१५ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | उत्तमनगर पो स्टे ११८/२०२४,भारतीय न्याय संहिता कलम ३१०(४),३१०(५),भारतीय हत्यार कायद्याचे कलम ३(२५),४(२५) महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५ |
| **फिर्यादी** | दिपक चोखोबा कांबळे,पोलीस अमंलदार नेमणुक उत्तमनगर पोलीस ठाणे,पुणे शहर |
| **आरोपीत** | १) वैभव नारायण गौडी,वय २० वर्षे,रा.वारजे,पुणे २) ओम राजेश व्हावळ,वय २१ वर्षे,रा. साईलिला अपार्टमेंट,वारजे,पुणे ३) हर्षल प्रदिप वरघडे,वय २० वर्षे,रा.लक्ष्मी निवास,कॅनॉल रोड,कर्वेनगर,पुणे ४) स्वप्निल भगवान कांबळे,वय १९ वर्षे,रा.मावळे आळी,कर्वेनगर,पुणे (अटक) एक अल्पवयीन बालक (ताब्यात) व इतर तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २१/०९/२०२४ रोजी रात्रौ २२/१५ वा.चे सुमारास एकांत किनारा हॉटेल,मुठा नदीचे किनाऱ्या शेजारी,मांडवी खु// स्मशानभुमी ता.हवेली जि.पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी संगनमत करून,मा.सह पोलीस आयुक्त,पुणे शहर यांचे पुणे पोलीस आयुक्तालयाचे क्षेत्रात शस्त्रे,सोटे,तलवारी,शारिरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तु जवळ बाळगण्यास बंदी आदेश असताना,त्यांनी सदर प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग करून,आपले कब्जात बेकायदेशीररित्या व अनधिकृतपणे एक देशी बनावटीचे पिस्टल, दोन जिवंत काडतुस,एक लोंखंडी कोयता,मिरचीपुड,नायलॉन दोरी,स्क्रु ड्रायव्हर व एक होंडा ॲक्टीव्हा मोपेड असा एकुण ३५,३३०/-रू.किमतीचा ऐवज बेकायदेशीररित्या आपले जवळ बाळगुन,हत्याराची व साथीदारांची जमवाजमव करून,दरोडा टकाण्याची पुर्ण तयारी करून, एकांत किनारा हॉटेलवर स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी दरोडा टाकण्याचे तयारीत असताना मिळुन आले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.मुकेश कुरेवाड,मो.नं.९०२८०५६३३५ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ४७९/२०२४,भारतीय न्याय संहिता कलम १०६,२२३,२८१,३(५) |
| **फिर्यादी** | पंकज वसंत मुसळे पोलिस अमंलदार नेमणूक चंदननगर पोलीस स्टेशन पुणे |
| **आरोपीत** | चार इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २२/०९/२०२४ रोजी सकाळी १०/४० वा.चे सुमारास आनंद पार्क रोड वडगावशेरी भाजी मंडईचौक वडगावशेरी पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची फिर्याद की, वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी हजरत मोहमंद पैगंबर जयंतीनिमित्त मिम बॉईज यंग फ्रेन्ड सर्कल,वडगावशेरी यांनी मिरवणूकीचे नियोजन करून मंडळाचे अध्यक्ष यास पोलीसांच्या वतीने देण्यात आलेल्या परवानगीमध्ये मिरवणूकीच्या दरम्यान शर्ती व अटीचे सुचना देवून सुध्दा सुचनांचे पालन न करता दुर्लक्ष करून त्याने मिरवणूकी करिता झेंडे व स्टीलचे पाईप उपलब्ध करून दिले.तसेच ट्रॅक्टर चालक याने ट्रॅक्टर ट्रॉलीचे फाळके काढून मर्यादेबाहेर विनापरवाना लाकडी स्टेज टाकून त्यावर साऊड सिस्टीम लावण्यास परवानगी दिली. साउंड मालक याने ४ बेस ४ टॉप एकावर एक रचून मर्यादापेक्षा उंचीं निर्माण केली व लाईट डेकोरेटर याने ट्रॅक्टरवर लोखंडी फ्रेम लावून त्यावर एलएडी स्क्रीन लावून त्यांची मर्यादापेक्षा उंची निर्माण करून मंडळाचे अध्यक्ष,ट्रॅक्टर चालक,स्पीकर मालक व एलएडीचे डेकोरेटर यांनी लोकांच्या जीवीतीच्या सुरक्षितेची कोणत्याही प्रकारची उपाय योजना न करता ट्रॅक्टर चालक याने त्याच्या ताब्यात असलेला ट्रॅक्टर हा ट्रॅक्टरवर चढलेल्या लोकांचा विचार न करता अविचाराने व हयगयीने वाहन चालवून अल्पवयीन मुलगा वय १७ वर्षे रा.वाडेश्वरनगर,वडगावशेरी पुणे हा लोखंडी प्रेमवर चढून हातात स्टीलचा पाईप असलेला झेंडा फिरवत असताना त्याच्या उंचीवर असलेली एमईसीईबीची हाय टेन्शनची विद्युत प्रवाहाच्या तारेला करंट लागल्याने त्यामध्ये शॉक लागून मृत्यु झाला आहे.तसेच समोर ट्रॅक्टरवर उभा असलेला मुलगा नामे जक्रीया बिलाल शेख वय २० वर्षे रा.इनामदार शाळा जवळ,वडगावशेरी पुणे यास सुध्दा शॉक लागून जखमी होवून त्यांचे मृत्युस कारणीभूत झाले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.पी.एस.माने.मो.नं.७३५०७७८१०० |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे ३६६/२०२४, भारतीय न्याय संहिता कलम ३०५(ए),३३१(३),३३१(४) |
| **फिर्यादी** | एक महिला वय ७८ वर्षे, रा.मुंढवा,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १८/०९/२०२४ रोजी दुपारी १६/०० वा. ते दिनांक १९/०९/२०२४ रोजी दुपारी १६/०० वा.चे दरम्यान स.नं.४८/१/२/१, रोशन व्हीला,सह्याद्री पार्क,मुंढवा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराच्या मेन दरवाजाचा कडी कोयंडा तोडून आतमध्ये प्रवेश करून बेडरूमचा कडी कोयंडा तोडून कपाटात ठेवलेले रोख ८०,०००/-रुपये व सोन्याचे दागिने असा एकुण २,५५,०००/- रू किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.समीर करपे,मो.नं.९९२३३२८४३३ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**